"**SNA-SPARSH**" कार्यपध्दतीच्या प्रयोजनार्य पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (**RGSA**) या केंद्र पुरस्कृत योजनेकरीता समन्वय अधिकारी (**Nodal Officer**) व एकल मध्यवर्ती अभिकरण [**Single Nodal Agency (SNA)**] नियुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः राग्रास्व-२०२५/प्र.क्र.५७/११८०९९०/आस्था-१५
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२५

वाचा :-

१. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.राग्रास्व-२०२१/प्र.क्र.५८/आस्था-१५,दि.२९.०९.२०२१.
२. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.राग्रास्वअ-२०२२/प्र.क्र.४०/आस्था-१५,दि.१६.०९.२०२२.
३. ग्राम विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.राग्रास्वअ-२०२२/प्र.क्र.४०/आस्था-१५,दि.२५.०६.२०२३
४. वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.file No.१(२७)/PFMS/२०२०, दि.१३.०७.२०२३.
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.११.१०.२०२४.
६. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा प्रशा-४, दि.२३.०४.२०२५.
७. वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.file No.१(२७)/PFMS/२०२०, दि.१०.०६.२०२५.
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४४/कोषा प्रशा-४, दि.१८.०६.२०२५.
९. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४७/कोषा प्रशा-४, दि.१९.०६.२०२५.
१०. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.३०.०७.२०२५.

प्रस्तावना :-

केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही स्तरांवरील रोख व्यवस्थापनामध्ये अधिक परिणामकारकता साधण्यासाठी सार्वजनिक वितीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS), राज्याची एकात्मिक वितीय व्यवस्थापन माहिती प्रणाली (State IFMIS) आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची ई-कुबेर प्रणाली यांच्या एकात्मिक रचनेच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरित करण्यासाठी "SNA-SPARSH" (समयोचित प्रणाली एकीकृत शीघ्र हस्तांतरण- Real Time System of integrated Quick Transfers) ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपद्धती लागू करण्याचा निर्णय भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाने संदर्भ क्रमांक ४ येथील ज्ञापनान्वये घेतला आहे.

२. वित्त मंत्रालय, भारत सरकार येथील व्यय विभागाने, संदर्भ क्रमांक ७ येथील कार्यालयीन ज्ञापनान्वये "SNA-SPARSH" अंतर्गत अंमलबजावणीसाठी अतिरिक्त ३७ केंद्र पुरस्कृत योजनांचा नव्याने अंतर्भाव करण्यात आला आहे. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाच्या निर्देशास अनुसरुन, "SNA-SPARSH" अंतर्गत केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या संबंधित विभागाने भारतीय रिझर्व्ह बँक येथे राज्य संलग्नित योजना (State linked schemes) निहाय स्वतंत्र आहरण खाते (Drawing Account) उघडणे अनिवार्य आहे. त्यासाठी वित्त विभागाने संदर्भ क्र.०८ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या केंद्र पुरस्कृत योजना "SNA-SPARSH" कार्यप्रणाली अंतर्गत

ऑनबोडींग करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने राज्य संलग्नित योजनांसाठी भारतीय रिझर्व्ह बँक येथे प्रत्येकी एक स्वतंत्र आहरण खाते उघडणे आवश्यक असून वित्त विभागाने सदर बँक खाते उघडण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित केली आहे.

३. उपरोक्त प्रमाणे मान्यता प्रदान करण्यात आलेल्या एकूण ३७ केंद्र पुरस्कृत योजनापैकी ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाकरिता भारतीय रिझर्व्ह बँक येथे स्वतंत्र आहरण खाते उघडणे आवश्यक आहे. भारत सरकारच्या संदर्भ क्रमांक ४ येथील ज्ञापनातील परिच्छेद क्र.३ (ii) मध्ये नमुद केल्यानुसार या विभागाच्या संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेकरिता SNA व Nodal officer बाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच वित्त विभागाने सदर बँक खाते उघडण्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपद्धती विचारात घेऊन, "SNA-SPARSH" कार्यपद्धतीच्या प्रयोजनार्थ सदर योजनेसाठी एकल मध्यवर्ती अभिकरण [Single Nodal Agency (SNA)] व समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेकरीता "SNA SPARSH" या कार्यपद्धतीच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ खालीलप्रमाणे समन्वय अधिकारी (Nodal Officer) व एकल मध्यवर्ती अभिकरण [Single Nodal Agency (SNA)] यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | केंद्र पुरस्कृत योजनेचे नाव व PFMS Code | राज्य संलग्नित योजनेचा संकेतांक | स्टेट स्कीम मॅनेजर (SSM) | समन्वय अधिकारी (Nodal Officer) | एकल मध्यवर्ती अभिकरण [Single Nodal Agency] |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३६१७ राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान | MH - ३९७ | सह सचिव / उप सचिव, आस्थापना-१५, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे | राज्य व्यवस्थापन कक्ष, पंचायत राज कार्यालय |

२. समन्वय अधिकारी :- समन्वय अधिकारी हे त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजना, सार्वजनिक वितीय व्यवस्थापन प्रणालीवर "SNA-SPARSH मार्फत राबविण्याच्या दृष्टीने समन्वयाचे काम करतील.

३. एकल मध्यवर्ती अभिकरण :- केंद्र शासन तसेच राज्य शासन यांचेमार्फत केंद्र पुरस्कृत योजनांची सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन **प्रणालीवर** "SNA-SPARSH" मार्फत अंमलबजावणी करण्याकरिता निर्गमित केलेल्या केंद्र पुरस्कृत योजनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन एकल मध्यवर्ती अभिकरण यांनी आवश्यकतेनुसार तात्काळ कार्यवाही करावी.

४. वरील तक्त्यात नमूद राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेकरीता वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४८/२०२५/कोषा प्रशा-०४, दि.२५.०७.२०२५ व महालेखापाल कार्यालयाचा अनौपचारिक संदर्भ क्र.ख.वि/चा-१/ग्राविवि/यूओआर ११६/२०२५-२६/७११, दि.०८.०८.२०२५ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँक येथे स्वतंत्र आहरण खाते (Drawing Account) उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.१०.१०.२०२४ व शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.११.१०.२०२४ अन्वये निर्गमित केलेल्या व वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८१११६५०३७९८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAUSTUBH SUDHAKAR RANE

Digitally signed by KAUSTUBH SUDHAKAR RANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=78b99ab06beb869e5c389d21dd25d4a1a60d87c91cb0bb868021d70abc925c3b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BAAAFEFABBD1DFDAD691286AA9D035C7536D65527975D97124960BB882959CDB, cn=KAUSTUBH SUDHAKAR RANE
Date: 2025.08.11 18:00:57 +05'30'

(कौस्तुभ राणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन मुंबई.
५. मा.विधान सभा/ मा.विधान परिषद सदस्य (सर्व)
६. मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव
८. अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक
९. अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक
१०. प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
११. प्रधान सचिव (आदिवासी विकास) यांचे स्वीय सहायक
१२. प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे स्वीय सहायक
१३. प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) यांचे स्वीय सहायक
१४. विभागीय आयुक्त, पुणे.
१५. संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), बाणेर रोड, पुणे
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१८. उप सचिव (सर्व), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
१९. वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-१७) मंत्रालय, मुंबई-३२
२०. नियोजन विभाग (का.क्र.१४४४), मंत्रालय, मुंबई-३२.
२१. कार्यासन (वित्त-१), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
२२. निवडनस्ती (आस्था-१५)